ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

Mahatma Gandhi

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018 Book IX

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE

On the Occasion of

UGC SPONSORED (Under CPE Scheme) NATIONAL SEMINAR On

# GENDER AND SOCIETY

January 30, 2018



Editor

**Dr. K.C. Shende**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Est. 1950

Organized by

**The Department of Sociology**

Nanded Education Society's

## People's College, Nanded

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd.1983
Purna (Jn.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami M...
Purna (Jn.) Dist.Par...

# स्त्रीवाद आणि स्त्रीमुक्ती चळवळ

**अंबिका गोविंदराव चोंडे (कापसे)**
संशोधक विद्यार्थी (एम.फील.)
स्वा.रा.ती.म. नांदेड

स्त्रीवादी चळवळीच्या उदयासाठी महत्त्वाचे काम स्त्रीवादी साहित्याने केले. स्त्रीवादी साहित्याच्या माध्यमातून जगामध्ये स्त्रीवादी विचारधारेचा प्रचार व प्रसार सुरु झाला. स्त्रीवादी विचाराचा आणि स्त्रीवादी साहित्य समीक्षेचा पाया घातल्याचे क्रांतिकारक काम युरोपमधल्या दोन विचारवंत लेखिकांनी केले. त्यात लेखिका व्हर्जिनिया वुल्फ आणि दुसरी सिमान द बोव्हा ह्या दोघींच्या लिखाणातून जीवन आणि साहित्य ह्यांची वेगळी अशी स्त्रीप्रणीत मीमांसा प्रस्थापित झाली. स्त्रीला व्यक्ती म्हणून महत्त्व न देता तिच्याकडे वस्तू म्हणून पाहीले जाते. 'चूल आणि मूल' या चाकोरीत स्त्रियांना परंपरेच्या नावाखाली बंदीस्त केले गेले. शरीरावरून तिच्याकडे बघण्याची वहिवाट ठरलेली असून स्त्रियांना पुरूषांप्रमाणे सर्वांगीण विकास करण्यासाठी मर्यादीत क्षेत्राची आखणी समाज करीत असतो, यासह स्त्रियांनी कुटूंबात पुरुषांच्या शब्दाबाहेर पडता कामा नये हा विचार रुढ आहे. तसेच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक राजकीय या क्षेत्रातही तीला दुय्यम स्थान देण्याचा प्रयत्न पुरुषांकडून केला जातो. स्त्रीयांच्या आत्म्याचे रुदन किंवा तीच्या भावना समाज समजून न घेता निर्णय तीच्यावर लादत असतो. या पुरुषांच्या मानसिकतेला प्रश्न केले पाहीजे. मानव म्हणून आपल्या ईच्छा, आकांक्षा, हक्क, अधिकार मिळविले पाहीजे या विचाराला अनुसरुन साहित्य लिहिण्यात येऊ लागले. 'पुरुष रचित स्त्रीवादाचेच रुप ज्या स्त्रीलिखित वाङ्मयात दिसते ते वाङ्मय feminine (पारंपरिक स्त्रीविशिष्ट) अवस्थेतील वाङ्मय होय. स्त्रीनिर्मितीत प्रतिमा, शैली, संरचना, निवेदन पद्धती या सर्वांवर अशा वाङ्मयात पुरुषप्रधान व्यवस्थेचा प्रभाव दिसतो. क्वचित त्यात स्त्रीवादी आशय असला तरी तो सलगपणे येत नाही. संहितेच्या सूक्ष्म वाचनात तो तुटक तुटकपणे जाणवतो. ज्या स्त्रीलिखित वाङ्मयातून पुरुषसत्ताक व्यवस्थेचे रचलेले कायदे, शास्त्रे, ज्ञानव्यूह स्त्री-पुरुष प्रतिमा या सर्वांनाच नकार मिळत जातो व काही वेळा स्त्री केंद्री विश्वाचे आदर्श, कल्पनारम्य चित्र रेखाटले जाते असे वाङ्मय feminist (स्त्रीवादी) होय.[१]

स्त्रियांचे बौद्धीक होणे, स्त्रियांनी प्रगती करणे, स्त्रियांनी प्रश्न विचारणे आजही समाजाला रुजत नाही. म्हणून स्त्रीवादी साहित्य विचार देते, स्त्रीमुक्तीला महत्त्व देते. समाजाच्या मानसिक, भावनिक आणि बौद्धिक स्तरावर परिवर्तन येणार नाही तोपर्यंत स्त्रीमुक्तीसाठी स्त्रीवादी साहित्याचे लिखाण होत राहणार आहे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

स्त्रीवाद ही स्त्री शोषणाविरुद्ध एक चळवळ, लढा वा आंदोलन आहे. स्त्रियांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार करुन त्याचे निराकारण करण्याचा प्रयत्न विविध स्त्रीवादी प्रवाहाच्या माध्यमातून केला जातो, त्यास साहित्य हे एक माध्यम आहे. "समाजजीवनातील शतकानुशतकापासूंन चालत आलेला स्त्रीवरील अन्याय दूर करण्याच्या उद्देशाने स्त्री चळवळ कार्यरत राहिली आणि त्या चळवळीने जीवनाचे महत्त्वाचे अंग असणाऱ्या कला विश्वाकडेही आपला मोर्चा वळवीला. स्त्री-पुरुषांच्या भूमिका निर्माण करणारी कलेसारखी क्षेत्रे खूप महत्त्वाची असतात. तेथे आमुलाग्र बदल घडून येणे अत्यावश्यक असल्याने साहित्यप्रांतात दाखल होणे स्त्रीवादापुढचे एक महत्त्वाचे पाऊल ठरते."[२] तसेच प्रस्थापित समाज व्यवस्थेत पुरुषांच्या विरुद्ध जाऊन लेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेची कृपा संपादन करुन त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन करणारी मानसिकता बऱ्याच अंशी आहे. विरोध, बदनामी या भीतीपोटी लेखनात येणारी मर्यादा स्त्रीवादी साहित्याला अडसर आहे. जैविक लिंगभाव मान्य केला तरी इतर क्षेत्रातील लिंगभाव अनैसर्गिक आहे. लादलेला आहे, सामाजिक लिंगभाव हा सर्वथा चूकीचा आहे. हा विचार स्त्रीवादातून येतो. महात्मा फुले यांच्या काळातील ताराबाई शिंदे यांनी स्त्रीवादी भूमिका घेऊन, स्त्रीपुरुष समानता निर्माण करण्यासाठी 'स्त्री पुरुष तुलना' या ग्रंथाचे लेखन केले, 'स्त्रीया केवळ गोठणांतील म्हशीप्रमाणे मुर्ख, त्यांना ना लिहीणे ना वाचणे म्हणून का ईश्वराने त्यांना काहीच बुद्धी दिली नसेल काय ? तरी त्या अविचारी असूनही तुमच्यापेक्षा बऱ्या. तुम्ही शहाणे आहात खरे.'[३] ताराबाई शिंदे यांनी पुरुषांच्या स्वार्थी वृत्तीचे आणि स्त्रियांना देण्यात येत असलेल्या दुय्यम वागणूकीचे वास्तव 'स्त्री पुरुष तुलना' या निबंधातून केलेले दिसते.

स्त्रीवाद ही पाश्चिमात्य संकल्पना आहे. समान हक्क, समान दर्जा, आणि स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मूळ कल्पना आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीच्या उदयाने या कल्पना पुढे आल्या त्यात रुसो, लॉक, बेथम यांचे मोठे योगदान आहे. मी एक माणूस आहे हा विचार केंद्रस्थानी आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स या देशामध्ये जी राजकीय स्थित्यंतरे झाली त्यातून 'राजकीय हक्क' ही जी संज्ञा निर्माण झाली. ती स्त्री वर्गात चळवळ सादृश्य वस्तुस्थिती निर्माण करणारी ठरली. पुरुषांचे राजकीय हक्क आणि स्त्रियांचे राजकीय हक्क यामधील तफावत दूर करण्यासाठी स्त्रियांनी हालचाली सुरु केल्या. फ्रेंच राज्यक्रांतीच्या संदर्भात मेरी वुल स्टोनक्राफ्ट या लेखिकेने 'द व्हिडिकेशन ऑफ राईट्स ऑफ विमेन' हे स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करणारे पुस्तक इ.स. १७९२ मध्ये प्रकाशित झाले. हे पुस्तक स्त्रीवादाचा प्रारंभ करणारे पुस्तक होय."[४] पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनाही मतदानाचा अधिकर प्राप्त व्हावा यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये लढा उभा केला गेला.

स्त्रीवाद ही स्त्री शोषणाविरुद्ध एक चळवळ लढा वा आंदोलन आहे. स्त्रियांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार करुन त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न विविध स्त्रीवादी प्रवाहाच्या

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani
Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Dist. Parbhani - 431511 (M.S.)

माध्यमातून केला गेलेला दिसतो. समाज व्यवस्थेतील अर्थकारण, राजकारण, सांस्कृतिक, धर्मिक, कौटुंबिक अशा सर्वच ठिकाणी पुरुषांचा पगडा राहिला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले. स्त्री-पुरुष लिंग भेदाला प्रामुख्याने नैसर्गिक शरीररचना जबाबदार असून या लिंग-भेदामुळे स्त्री प्रगतीचे त्यांच्या विकासाचे सर्वच मार्ग बंद केले गेले. पुरुष व्यवसथेच्या या विषमतेला विरोध करण्यासाठी जगातील सर्वच सुधारणावादी मंडळींनी पुढाकार घेतला, तसेच सर्वच स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या स्वातंत्र्याचा उद्घोष केला आहे. आधुनिक काळात स्त्रीवादाने उग्ररुप धारण केले. मील या विचारवंताने 'स्त्रीयांची गुलामगिरी' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहीला. या विचाराने स्त्रीमुक्ती चळवळ अतिशय कार्यक्षमतेने व प्रभावीपणे कार्यान्वित झाली.

भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले, त्या सुधारणावादी विचाराचे बळ स्त्रीवादास मिळाले. महाराष्ट्रात महात्माफुले यांच्या कार्यामुळे अनेक स्त्रियांना शिक्षण प्राप्त होऊ लागले. शिक्षणातून स्व-जाणीव प्राप्त होते. पुरुषांच्या मनमानी कारभारास त्यामुळे आडकाठी प्राप्त होते, आपला अस्तित्वासाठी संघर्ष करण्याचे बळ स्त्रियांना प्राप्त होते. महात्मा फुले यांच्या शिष्या ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्रीपुरुष तुलना' या निबंधातील विचार स्त्रीवादी विचारास बळ देणारे आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना अधिकार दिले. "स्वतंत्र भारताच्या संविधानात लिंग समानता" हे तत्त्व निर्माण करण्याचे सर्व प्रयत्न केले गेले. स्त्री पुरुष दोघांना त्यांनी समान हक्क जाणीवपूर्वक बहाल केले होते. स्त्रियांबाबत विशेष कायदा निर्माण केला गेला. प्रत्यक्षात मात्र घटनेची हमी व कायदे असून देखील स्त्रियांच्या पदरी काही आले नाही."[५] स्त्रीयांच्या जीवनात स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. स्त्रीला कायद्याने समानता मिळाली पण तिच्या दर्जात सुधारणा झाली का ? याचे उत्तर नकारार्थी आढळते. आज स्त्री पायांची दासी हा विचार जरी लुप्त झाला असला तरी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन पूर्णतः बदललेला नाही.

"भारतात परिवर्तनाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतर सुरु झाली. 'शुद्र' आणि 'स्त्री' यांच्या दृष्टीने फार मोठे असे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. भारतीय स्त्रीच्या वाट्याला स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत दुःख, दास्य, छळ, अवहेलना यामुळे तिला आपल्या माणूसपणाची जाणीवच नव्हती. 'जाचू नको राया, तुमच्या पायाची दासी, राहिन मी उपासी, घास घालीन तुपासी' असे म्हणत ती त्यागाची परिसिमा गाठत होती."[६] स्त्रियांच्या जीवनात बदल घडवून आणण्याचा जसा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे तसेच स्त्रीवादाने या परिवर्तनासाठी स्त्रियांच्या लेखनातून हा महत्त्वाचा विचार मांडला. स्त्रियांची सामाजिक आणि मानसिक दास्यातून सोडवणूक करणे तिच्यावर असणाऱ्या बंधनाला झुगारून तीची सुटका त्यापासून करणे हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट राहीले. स्त्रीमुक्त झाली तर परिवर्तन होईल हा विचार स्त्रीवादामध्ये आढळतो.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

स्त्रीवादाच्या निर्मितीचा थोडक्यात आढावा घेताना आढळणारी काही कारणे पुढील प्रमाणे सांगता येतात. १) अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांती २) स्त्रीवादी साहित्य ३) सामाजिक सुधारणा ४) राजकीय विचारवंताचे योगदान ५) सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग ६) संविधान आणि संविधानातील कायदे ७) औद्योगिकीकरण आणि नागरीकरण ८) आंतरराष्ट्रीय संघटनेचे महिला विषयक कार्ये ९) महिला संघटनाचा उदय १०) शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार.

**संदर्भ :**

१) डॉ. प्रतिभा कणेकर, स्त्रीवादी समीक्षा, वाङ्मयीन प्रवृत्ती: तत्त्वशोध, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. २४१.
२) डॉ. शोभा नाईक, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००७, पृ. ६.
३) संपा. नुतळ माळवी, स्त्री पुरुष समानता, कॅन्डीड प्रकाशन, पुणे, पृ. ३४.
४) शोभा नाईक, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, लोकवाङ्मय गृह, पुणे,२००७, पृ. ४.
५) सेठ पद्मा, स्त्रीया आणि सामाजिक विकास योजना, ८ फेब्रु. १९९५, पृ. ०९.
६) इंगोले प्रतिमा, स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकीकरण, सोनल प्रकाशन, अमरावती, १९९८, पृ. १६.

****

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

स्त्रीवादाच्या निर्मितीचा थोडक्यात आढावा [illegible] पुढील प्रमाणे सांगता येतात. १) अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांती २) स्त्रीवादी साहित्य ३) सामाजिक सुधारणा ४) राजकीय विचारवंताचे योगदान ५) सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग ६) संविधान आणि संविधानातील कायदे ७) औद्योगिकीकरण आणि नागरीकरण ८) आंतरराष्ट्रीय संघटनेचे महिला विषयक कार्ये ९) महिला संघटनाचा उदय १०) शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार.

**संदर्भ :**

१) डॉ. प्रतिभा कणेकर, स्त्रीवादी समीक्षा, वाङ्मयीन प्रवृत्तीः तत्त्वशोध, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. २४१.
२) डॉ. शोभा नाईक, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००७, पृ. ६.
३) संपा. नुतळ माळवी, स्त्री पुरुष समानता, कॅन्डीड प्रकाशन, पुणे, पृ. ३४.
४) शोभा नाईक, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, लोकवाङ्मय गृह, पुणे,२००७, पृ. ४.
५) सेठ पद्मा, स्त्रीया आणि सामाजिक विकास योजना, ८ फेब्रु. १९९५, पृ. ०९.
६) इंगोले प्रतिमा, स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकीकरण, सोनल प्रकाशन, अमरावती, १९९८, पृ. १६.

****

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani